# कोल्हापुरी चप्पल उद्योगात नवउद्योजक होण्याची संधी

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापुरी चप्पल क्लस्टरच्या संदर्भात कोल्हापूर जिल्हा चर्मवस्तू उत्पादक संघाशी झालेल्या सामंजस्य कराराद्वारे तरुण उद्योजक निर्माण करण्याबरोबरच जुन्या उद्योगांचे क्षमतावर्धन करण्याची संधी निर्माण झाली आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठ इनोव्हेशन, इनक्युबेशन, जागतिक लिंकेजिस आणि संशोधन या क्षेत्रांमध्ये सर्वतोपरी सहाय्य करेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा जिल्हा चर्मवस्तू उत्पादक, कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रा. लि. यांच्यासमवेत गुरुवारी सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापुरी चप्पलचे जागतिक स्तरावर नाव असले तरी बदलत्या



**शिवाजी विद्यापीठ व जिल्हा चर्मवस्तू उत्पादक, कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करार झाला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, अशोक गायकवाड, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालून वाढत्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी स्थानिक उद्योजकांशी सज्ज होण्याची गरज आहे. कोल्हापुरी चप्पलचे भौगोलिक स्थाननिश्चिती (जीआय) मानांकन झाले असले तरी त्याची गुणवत्ता सिद्ध करून देणे, विद्यापीठातील तज्ज्ञांचे दर्जावृद्धीबाबत मार्गदर्शन मिळवून देणे याबाबत विद्यापीठ सकारात्मकपणे प्रयत्न करील. मेडिकल चप्पलच्या अनुषंगानेही संशोधन करण्याची मोठी संधी आहे. त्याला परदेशी पर्यटकांचीही मोठी पसंती लाभेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

क्लस्टरचे चेअरमन अशोक गायकवाड म्हणाले, शहरी व ग्रामीण भागामध्ये जे छोटे उद्योजक पारंपरिक पद्धतीने उत्पादन करून विक्री करतात. असे उद्योजक खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत टिकाव धरू शकत नाहीत, अशा उद्योगांकरिता नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करून त्यांच्यापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

रसायनशास्त्र विभागाच्या डॉ. पी. एन. भोसले यांनी कोल्हापुरी चप्पलच्या संशोधन व संवर्धनासाठी गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या कामाची माहिती दिली. सामंजस्य करारावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, डॉ. गजानन राशिनकर आदींसह संघाचे पदाधिकारी, सदस्य आणि त्यांचे कुटुंबीयही उपस्थित होते. यावेळी सामंजस्य करारावर प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे आणि गायकवाड यांनी स्वाक्षरी केल्या.

### कोल्हापुरी चप्पल क्लस्टर योजनेबाबत...

*शासनाने कोल्हापुरी चप्पल क्लस्टर उभारणीसाठी रु. १५ कोटी इतक्या रकमेची तरतूद केली आहे. राज्याच्या व देशाच्या सीमा ओलांडून जागतिक बाजारपेठेत आपल्या नावीन्यपूर्ण गुणधर्मामुळे कोल्हापुरी चप्पल हे नाव कमावलेल्या आणि स्वत:च्या प्रगतीबरोबरच देशाला परकीय चलन मिळवून देण्यासाठी या क्लस्टर योजनेचा उपयोग होणार असल्याचे यावेळी मान्यवरांनी स्पष्ट केले.*

लोकमत

## क्लस्टर योजना : चर्मवस्तू उत्पादक संघासमवेत सामंजस्य करार; पेटंटसाठी प्रस्ताव देणार

# 'कोल्हापुरी चप्पल' उद्योगाला विद्यापीठाचे बळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** करवीरनगरीची वेगळी ओळख असलेल्या 'कोल्हापुरी चप्पल' उद्योगाला आता शिवाजी विद्यापीठाचे बळ मिळणार आहे. विद्यापीठाने कोल्हापुरी चप्पल क्लस्टरबाबत जिल्हा चर्मवस्तू उत्पादक संघासमवेत गुरुवारी सामंजस्य करार केला.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात झालेल्या या सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, ( पान ३ वर)

नसीर अत्तार



**शिवाजी विद्यापीठ आणि जिल्हा चर्मवस्तू उत्पादक संघ यांच्यात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि 'क्लस्टर'चे अध्यक्ष अशोक गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी सामंजस्य करार झाला. यावेळी जी. एस. गोकावी, ए. एम. गुरव, डी. टी. शिर्के, व्ही. एन. शिंदे, पी. एन. भोसले, व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित होते.**

> या सामंजस्य कराराद्वारे तरुण उद्योजक निर्माण करण्यासह जुन्या उद्योगांची क्षमतावर्धन करण्याची संधी निर्माण झाली आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ इनोव्हेशन, इन्क्युबेशन, जागतिक लिंकेजिस आणि संशोधन या क्षेत्रांमध्ये सर्वतोपरी साहाय्य करील.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु**

> शहरी, ग्रामीण भागांमधील लघुउद्योजकांपर्यंत नवनवे तंत्रज्ञान पोहोचविणे; दर्जेदार कोल्हापुरी चप्पलची निर्मिती करणे; उत्पादकांना सर्व सोईंनिशी योग्य दर मिळवून देणे; नवीन उद्योजक, तंत्रज्ञ व तंत्रज्ञान निर्माण करणे हा क्लस्टरचा उद्देश आहे.
>
> **- अशोक गायकवाड**

## क्लस्टरची वाटचाल

**कोल्हापुरी चप्पल उद्योगाला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी केंद्र शासनाने 'एमएसएमई सीडीपी' या योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्हा चर्मवस्तू उत्पादक विक्रेता संघटनेस कोल्हापुरी चप्पल क्लस्टर म्हणून दि.२४ जुलै २००८ ला पत्र दिले. 'मिटकॉन' या संस्थेने प्राथमिक निदानात्मक अहवाल पूर्ण करुन लघुउद्योग मंत्रालयाला सादर केला. हा अहवाल मंजूर होऊन शासनाने क्लस्टर उभारणीसाठी १५ कोटी रुपयांची तरतूद केली. आरोग्याच्या दृष्टीने गुडघेदुखी, पायांची जळजळ, डोळे** रखरखणे, मधुमेह, रक्तदाब, सुरळीत रक्ताभिसरण यांसाठी कॉपर सर्किट, मॅग्नेट, कुशनिंगचा वापर करुन आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे 'डॉक्टर कोल्हापुरी चप्पल'ची निर्मिती करण्याचा क्लस्टरचा मुख्य उद्देश असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

लोकमत

# 'कोल्हापुरी चप्पल' उद्योगाला बळ

(पान १ वरुन) डॉ. गजानन राशिनकर, आदी उपस्थित होते. सामंजस्य करारावर प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे आणि क्लस्टरचे अध्यक्ष अशोक गायकवाड यांनी स्वाक्षऱ्या केल्या. रसायनशास्त्र विभागाचे डॉ. पी. एन. भोसले यांनी कोल्हापुरी चप्पलच्या संशोधन व संवर्धनासाठी गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या कामाची माहिती दिली. दरम्यान, या क्लस्टर आणि सामंजस्य कराराच्या माध्यमातून अद्ययावत कॉमन फॅसिलिटी सेंटर सुरु करणे, आधुनिक कलाकुसरीसाठी कारागिरांना प्रशिक्षण देणे, महिला कारागिरांसाठी सेल्फ हेल्प ग्रुप तयार करणे, शिवाजी विद्यापीठ अधिविभागामार्फत अॅनॅलिसिस मार्केटिंगसाठी चर्चासत्रे, लॅबोरेटरी, लायब्ररी संशोधनासाठी सुविधा पुरविणे. पेटंटसाठी प्रस्ताव सादर करणे, उद्योजक तयार होण्यासाठी व स्वयंरोजगारासाठी शॉर्ट टर्म कोर्सेस या सुविधा मिळणार आहेत.

# 'कोल्हापुरी'ला झळाळी

## विद्यापीठाचा कोल्हापुरी चप्पल क्लस्टरशी सामंजस्य करार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'जगाच्या नकाशावर कोल्हापुरी चप्पलला ओळख देणाऱ्या कारागिरीला तंत्रशुद्ध गुणवत्तेची जोड देणाऱ्या सामंजस्य करारामुळे कोल्हापुरी चप्पल निर्मितीमध्ये युवा उद्योजकांच्या सहभागासह क्षमतावृद्धीच्या अनेक संधी निर्माण होणार आहेत. स्थानिक कारागीरांना व्यासपीठ देण्याच्या सामाजिक जबाबदारीतून कोल्हापुरी चप्पल निर्मितीला शिवाजी विद्यापीठ इनोव्हेशन, इनक्युबेशन, जागतिक लिंकेजिस आणि संशोधन या क्षेत्रांमध्ये सर्वतोपरी सहाय्य करेल,' असे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी स्पष्ट केले. शिवाजी विद्यापीठ व जिल्हा चर्मवस्तु उत्पादक, कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रा.लि. यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराबाबत माहिती देताना डॉ. शिंदे बोलत होते.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या सामंजस्य कराराप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जी.एस. गोकावी, डॉ. गजानन राशिनकर, क्लस्टरचे चेअरमन अशोक गायकवाड यांच्यासह संघाचे पदाधिकारी, सदस्य आणि त्यांचे कुटुंबीयही उपस्थित होते. यावेळी सामंजस्य करारावर डॉ. शिंदे आणि गायकवाड यांनी स्वाक्षरी केल्या.



कोल्हापूर जिल्हा चर्मवस्तू उत्पादक संघासमवेत सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व चेअरमन अशोक गायकवाड. सोबत प्रा. जी. एस. गोकावी, डॉ. ए. एम. गुरव, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. एन. भोसले आदी.

यावेळी डॉ. शिंदे म्हणाले, 'योग्य बाजारपेठ न मिळाल्यास कोल्हापुरी चप्पल बनवणारी तीन हजार कुटुंबे व या समाजातील युवा पिढीचा रोजगार बंद होण्याची वेळ येऊ शकते. त्यासाठी कोल्हापुरी चप्पलला नव्या काळासोबत बदलण्याची गरज आहे. पारंपरिक डिझाइन आणि नवतंत्राचा वापर करून चपलाचा टिकावूपणा यांना महत्त्व देण्याच्या विचारातून हा करार केला आहे. या करारानुसार विद्यापीठातील विविध अधिविभागातील तज्ज्ञांच्या मदतीने कोल्हापुरी चप्पलची तंत्रशुद्ध गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. या चपलाबाबत संशोधनालाही चालना देण्यात येणार आहे. आधुनिक जैवतंत्रज्ञान, नॅनोतंत्रज्ञान यांच्या सहाय्याने या चप्पलचा दर्जा, गुणवत्ता व टिकाऊपणा वृद्धिंगत करण्यासाठी संशोधन करता येईल. मेडिकल चप्पलच्या अनुषंगानेही संशोधन करण्याची संधी आहे. त्याला परदेशी पर्यटकांचीही पसंती लाभेल.'

अशोक गायकवाड म्हणाले, 'कच्च्या मालापासून दर्जेदार कोल्हापुरी चप्पलची निर्मिती करणे, देशांतर्गत व देशाबाहेरील बाजारपेठेत उत्पादकांना सर्व सोयींनिशी योग्य दर मिळवून देणे आणि नवीन उद्योजक, तंत्रज्ञ व तंत्रज्ञान निर्माण करणे हा क्लस्टरचा मुख्य उद्देश आहे.'

यावेळी रसायनशास्त्र विभागाच्या डॉ. पी.एन. भोसले यांनी कोल्हापुरी चप्पलच्या संशोधन व संवर्धनासाठी गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या कामाची माहिती दिली.

### क्लस्टर योजनेबाबत...

कोल्हापुरी चप्पल कारागिरांचे कसबी हात, हस्तकला, कलाकुसर अशा स्वबळावर विकासाची वाटचाल करणाऱ्या कोल्हापुरी चप्पल उद्योगाला या क्लस्टर योजनेमुळे भविष्यात प्रगतीची झेप घेण्याची संधी प्राप्त होणार आहे. राज्याच्या व देशाच्या सीमा ओलांडून जागतिक बाजारपेठेत आपल्या नाविन्यपूर्ण गुणधर्मांमुळे कोल्हापुरी चप्पल हे नाव कमावलेल्या आणि स्वतःच्या प्रगतीबरोबरच देशाला परकीय चलन मिळवून देण्यासाठी या क्लस्टर योजनेचा उपयोग होणार आहे.

### डॉक्टर चप्पलनिर्मिती यशस्वी

आरोग्याच्या दृष्टीने गुडघेदुखी, पायाची जळजळ, डोळे रखरखणे, डायबेटिज (शुगर), ब्लड प्रेशर, सुरळीत रक्ताभिसरण यासाठी सुद्धा कॉपर सर्किट, मॅग्नेट व कुशनिंगचा वापर करुन डॉक्टर कोल्हापुरी चप्पलची निर्मिती आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे करण्याचा मुख्य उद्देश आहे. कापशी, कुरुंदवाडी, मेहरबान, सहावेणी, पेंचिंगपट्टा, खास कोल्हापुरी चप्पलला आधुनिक व आरोग्यपूर्ण बनविण्याचा प्रश्न असणार आहे.

सकाळ

# उद्योजक घडविण्यासाठी साह्य करू

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; 'चप्पल क्लस्टर'शी सामंजस्य करार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : 'कोल्हापुरी चप्पल क्लस्टरच्या संदर्भात कोल्हापूर जिल्हा चर्मवस्तू उत्पादक संघाशी झालेल्या सामंजस्य कराराद्वारे तरुण उद्योजक निर्माण करण्यासह जुन्या उद्योगांचे क्षमतावर्धन करण्याची संधी निर्माण झाली आहे. यात शिवाजी विद्यापीठ इनोव्हेशन, इनक्युबेशन, जागतिक लिंकेजिस व संशोधन क्षेत्रांत सर्वतोपरी साह्य करेल,' असे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचा जिल्हा चर्मवस्तू उत्पादक, कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात आज सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते. सामंजस्य करारावर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व क्लस्टरचे चेअरमन अशोक गायकवाड यांनी स्वाक्षरी केल्या.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूर जिल्हा चर्मवस्तू उत्पादक संघातील सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अशोक गायकवाड. शेजारी प्रा. जी. एस. गोकावी, डॉ. ए. एम. गुरव, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. पी. एन. भोसले, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील.**

डॉ. शिंदे म्हणाले,''आधुनिक जैवतंत्रज्ञान, नॅनोतंत्रज्ञान यांच्या साह्याने चप्पलचा दर्जा, गुणवत्ता व टिकाऊपणा वृद्धिंगत करण्यासाठी संशोधन करता येईल. मेडिकल चप्पलच्या अनुषंगानेही संशोधन करण्याची संधी आहे.''

गायकवाड म्हणाले,''शहरी व ग्रामीण भागामध्ये जे छोटे उद्योजक पिढ्यान् पिढ्या पारंपरिक पद्धतीने उत्पादन करुन विक्री करतात. असे उद्योजक खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत टिकाव धरु शकत नाहीत, अशा उद्योगांकरिता नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करुन त्यांच्यापर्यंत पोचविणे, कच्च्या मालापासून दर्जेदार कोल्हापुरी चप्पलची निर्मिती करणे, देशांतर्गत व देशाबाहेरील बाजारपेठेत उत्पादकांना सर्व सोयीनिशी योग्य दर मिळवून देणे व नवीन उद्योजक, तंत्रज्ञ व तंत्रज्ञान निर्माण करणे हा क्लस्टरचा मुख्य उद्देश आहे.''

प्रा. डॉ. पी. एन. भोसले यांनी कोल्हापुरी चप्पलच्या संशोधन व संवर्धनासाठी गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या कामाची माहिती दिली.

| क्लस्टर योजनेतून मिळणाऱ्या सुविधा | अद्ययावत कॉमन फॅसिलिटी सेंटर | दर्जा व गुणवत्तेची नव्याने मांडणी | आधुनिक कलाकुसरीसाठी प्रशिक्षण | कोल्हापुरी चपलांचे नावीन्यपूर्ण डिझाईन | महिला कारागिरांसाठी सेल्फ हेल्प ग्रुप | देशात व परदेशांत बाजारपेठ मिळवून देणे | पेटंटसाठी प्रस्ताव देणे |
|---|---|---|---|---|---|---|---|

Kolhapur, Kolhapur-Today
26/10/2018 Page No. 7

26 OCT 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात साकारणार अत्याधुनिक लेदर क्लस्टर सेंटर

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : शिवाजी विद्यापीठ, जिल्हा चर्मवस्तू उत्पादन आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रा. लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर जिल्हा चर्मवस्तू उत्पादक व कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. शासनाने कोल्हापुरी चप्पल क्लस्टर सेंटरच्या उभारणीसाठी १५ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. या करारांतर्गत जिल्ह्यातील ३ हजार कुटुंबांला अत्याधुनिक पद्धतीने व्यवसाय करण्याची संधी व यातून तरुण उद्योजक निर्माण होतील. विद्यापीठातील इनोव्हेशन, इनक्युबेशनच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठ आणि संशोधन यासाठी सर्व सहकार्य केले जाईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, या सेंटरच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध पद्धतीने कोल्हापुरी चप्पल तयार करून त्याला नॅनो कोटींग करण्यासाठी प्रयत्न करूया. त्यामुळे चप्पलची विश्वासार्हता वाढून, परदेशी पर्यटकांना आकर्षित करून, व्यवसाय वाढवता येणार आहे. कोल्हापुरी चप्पलने जगाच्या पाठीवर कोल्हापूरची वेगळी ओळख निर्माण केली आहे. ही ओळख कायम ठेवण्यासाठी विद्यापीठ सदैव प्रयत्नशील राहणार आहे.

कोल्हापुरी चप्पल क्लस्टरचे चेअरमन अशोक गायकवाड म्हणाले, कोल्हापुरी चप्पल क्लस्टर सेंटरच्या उभारणीसाठी १५ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. यातून अत्याधुनिक मशिनरी, जागा, हॉलमार्ट तयार करून कोल्हापुरी चप्पलला जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवून दिले जाणार आहे. पारंपरिक हस्तकलेला मॉडर्न टेक्नॉलॉजीची जोड दिली जाणार आहे. यापासून ४० पटीने व्यवसाय वाढणार असून गरिबातला गरीब व्यावसायिक मोठा उद्योजक बनेल, असा विश्वास गायकवाड यांनी व्यक्त केला. कोल्हापुरी चप्पलची कलाकुसर व हस्तकलेच्या माध्यमातून सौंदर्य टिकवले आहे. शासनाच्या निधीतून सोयीसुविधा, देशांतर्गत व जागतिक बाजारपेठ आर्थिक सुधारण्यासाठी आवश्यक आधुनिक प्रशिक्षण कॉमन फॅसिलिटी सेंटर, कच्च्या मालाचा डेपो, खेळत्या भांडवलाची गरज, क्वालिटी कंट्रोल, लेदर टेस्टिंग लॅब, आधुनिक उपकरणे, उद्योगासाठी जागा या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

रसायनशास्त्र विभागाचे डॉ. पी. एन. भोसले म्हणाले, कोल्हापुरी चप्पलच्या संशोधन व संवर्धनासाठी गेल्या २५ वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. पण आता या प्रयत्नाला यश आले असून, सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र, जीवरसायनशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र आदी विभागातील संशोधक, प्राध्यापकांचे सहकार्य घेऊन या उद्योगाला सहकार्य केले जाईल.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, डॉ. गजानन राशिनकर यांच्यासह कोल्हापूर जिल्हा चर्मवस्तू उत्पादक व कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रायव्हेट लिमिटेडचे पदाधिकारी, सदस्य व कुटुंबीय उपस्थित होते.

### क्लस्टर योजनेतून मिळणाऱ्या सेवा सुविधा

- अद्यावत कॉमन फॅसिलिटी सेंटर (प्रात्यक्षिक व डेमोसाठी मॉडेल युनिट)
- तांत्रिक कमतरता ओळखून दर्जा व गुणवत्तेची नव्याने मांडणी करणे.
- आधुनिक कलाकुसर (हस्तकला) यासाठी कारागिरांना प्रशिक्षण देणे. (व्हॅल्यु ॲडेड प्रॉडक्ट तयार करणे)
- आतापर्यंत बनत असलेल्या कोल्हापुरी चप्पलबरोबर नावीन्यपूर्ण नवीन अनेक डिझाईनमध्ये आकर्षक कोल्हापुरी चप्पल बनवण्याचे प्रशिक्षण देणे.
- महिला कारागिरांसाठी सेल्फ हेल्प ग्रुप तयार करणे.
- बैठका, चर्चासत्रे संवादाव्दारे स्थानिक गरजासाठी प्रयत्न करणे.
- कारागिरांनी बनविलेल्या कोल्हापुरी चप्पलला बाजारपेठा मिळवून देणे.
- कोल्हापुरी चप्पलची देशात व परदेशात वेबसाईटवरून प्रसिध्दी करणे.
- शिवाजी विद्यापीठ अधिविभागामार्फत ॲनॅलिसिस मार्केटींगसाठी चर्चासत्रे, लॅबोरेटरी, लायब्ररी संशोधनासाठी सुविधा पुरविणे.
- कोल्हापुरी चप्पलसाठी स्वामित्व (पेटंट) साठी प्रस्ताव सादर करणे.
- कोल्हापुरी चप्पल क्लस्टरच्या विकासासाठी व तरुण कारागीर उद्योजक तयारहोण्यासाठी व स्वयंरोजगारासाठी शॉर्ट टर्म कोर्सेस (सर्टिफिकेट कोर्स, डिप्लोमा) एक व दोन सत्राचे (सेमिस्टर) चालू करणे.

26 OCT 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आजारांची मुक्ती करेल 'कोल्हापुरी डॉक्टर चप्पल'

## लवकरच बाजारात उपलब्ध : कोल्हापूर चप्पल क्लस्टर प्रा. लिमिटेड व विद्यापीठातील संशोधकांच्या प्रयत्नांना यश

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

कोल्हापूरची अनेक कारणांनी जागतिक बाजारपेठेत ओळख आहे. त्याबरोबर कोल्हापुरी चप्पलने जगभरात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. याला आता जोड म्हणून 'कोल्हापुरी डॉक्टर चप्पल' लवकरच बाजारात येणार आहे. ही चप्पल आयुर्वेदिक असून सर्वसामान्यांना परवडेल अशा दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ही चप्पल घातल्याने डोळ्यांचे आजार, पायाच्या भेगा,



रक्तदाब, शुगर, या आजारांपासून मुक्ती मिळणार आहे, असा दावा कोल्हापुरी चप्पल क्लस्टरचे चेअरमन अशोक गायकवाड यांनी केला आहे.

क्लस्टर प्रायव्हेट लिमिटेड व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापुरी डॉक्टर चप्पल तयार करण्यासाठी गेल्या चार वर्षांपासून संशोधन सुरू आहे. या चप्पलमध्ये आयुर्वेदिक लेदरचा वापर करण्यात येणार आहे. चमड्याची बॅग तयार करून त्यामध्ये बाभळीची साल, हिरडा, चुना, पाणी यासह अन्य साहित्य घालून महिनाभर ही बॅग झाडाला टांगून ठेवली जाते. महिन्यानंतर या बॅगेच्या लेदरवर प्रक्रिया करून त्यापासून चप्पल तयार केली जाणार आहे. तसेच ही चप्पल तयार करताना विशिष्ट धातूचा वापर केला जाईल. तसेच डोळ्याला गारवा मिळण्यासाठी लेदर कडूनिंब, कारल्याचा रस, रुईच्या पानाचाही यामध्ये वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे ही चप्पल आरोग्यदायी ठरणार आहे.

पान ६ पहा



### कमी दरात होणार उपलब्ध

कोल्हापुरी डॉक्टर चप्पल मार्केटमध्ये आणून 'ना नफा ना तोटा' याप्रमाणे कमी दरात विकली जाईल. लोकांचे ५० टक्के आजार कमी होणार असल्याने त्यांच्या आनंदात भर पडणार आहे. लवकरच ही चप्पल मार्केटमधील काही शोरूममध्ये उपलब्ध होईल. उद्योजक व संशोधकांच्या सल्ल्याने ही चप्पल तयार केल्याने ग्राहकांची मागणी वाढणार आहे.

**अशोक गायकवाड, चेअरमन, कोल्हापुरी चप्पल क्लस्टर.**

# आजारांची मुक्ती करेल 'कोल्हापुरी डॉक्टर चप्पल'

पान १ वरून

कोल्हापुरी डॉक्टर चप्पल तयार करण्यासाठी कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रायव्हेट लिमिटेडचे व्यावसायिक व शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभाग, एमएस्सी बायोटेक या विभागातील संशोधक गेल्या चार वर्षांपासून चेन्नई, मद्रास, आग्रा, कानपूर येथे जाऊन संशोधन करून आले आहेत. या संशोधनाअंती प्राथमिक पातळीवर काही चप्पल तयार करण्यात आल्या आहेत. पण या चप्पलला अत्याधुनिक मशिनरीच्या माध्यमातून आणखी शास्त्रशुध्द पध्दतीने तयार करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे कोल्हापुरी डॉक्टर चप्पलकडे ग्राहक आकर्षित होऊन परदेशी पर्यटकांच्या माध्यमातूनही या चप्पलला मागणी वाढू शकेल. आजकाल होणाऱ्या आजारांवर उपचारासाठी बरेच पैसे खर्च करावे लागतात. या औषधांवरील लोकांचा खर्च कमी करण्यासाठी ही चप्पल तयार केली असून याची किमत सर्वसामान्यांना परवडणारी आहे. चप्पल बाजारात आल्यानंतर सर्वसामान्य कारागिरांना काम देऊन त्यांच्यासह ग्राहकांचा पण फायदा करून देण्याचा मानस असल्याचे गायकडवाड म्हणाले.

### जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न

कोल्हापुरी डॉक्टर चप्पल जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. याबाबत लवकरच शिवाजी विद्यापीठात बैठक घेऊन कोणी किती संशोधन केले याचा अहवाल मागवला जाणार आहे. त्यानंतर येणाऱ्या सूचनांची दुरूस्ती करून कोल्हापुरी डॉक्टर चप्पल बाजारात आणले जाईल. यामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रायव्हेट लिमिटेड व जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

26 OCT 2018
Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity signs MoU with Kolhapuri chappal firm as social initiative

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has signed a Memorandum of Understanding (MoU) with Kolhapuri Chappal Cluster Private Limited on Thursday.

SUK vice-chancellor Devanand Shinde signed the MoU with Ashok Gaikwad, the chairman of the cluster. Shinde said that the varsity has a social responsibility to fulfil and this MoU is one of the important steps towards doing so.

"This MoU will serve a greater purpose for both the parties. The Kolhapuri chappals are known for their different styles across the world, but with the changing times, the technology of making them has also changed and that is where the research will be helpful in all this," he said.

He added that the varsity will make sure that all the elements that are associated with the cluster will have guidance made available for them from its faculty members and research fellows, so as to set new trends in the coming days.

According to Shinde, the MoU will also be helpful for research fellows with the availability of the techniques and people associated with it. "We can create a web of information with the help of this kind of MoU. It will also be helpful for the marketing of the Kolhapuri chappal," he added.

With such kind of initiatives being undertaken, young entrepreneurs will also be given a boost, he said.

Ashok Gaikwad said that in the business of the Kolhapuri chappal, the workers associated with it are mostly poor and they need to adapt to the modern technology while preserve their traditional artistic work which will enable them to create a greater mark on the world.

He added that with the help of the MoU, a ready-made platform has been made available for those seeking guidance about their products.

File Photo



A ready-made platform has been made available for those seeking guidance about their products

## SUK invites applications for pre-service centre entrance

The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited applications for admission to its pre-service centre for the year 2018-19.

The centre offers coaching in competitive exams and applications for admission must be submitted by October 29. The candidates have to appear for an entrance exam on November 2, according to a university statement. The merit list for the same will be announced on November 13, said Dr P S Kamble, the coordinator of the centre.

The university's pre-service centre offers coaching to backward and minority community students in various competitive exams. It was started in 2004. Students from the reserved categories and minority communities like Muslims, Christians, Sikhs, Buddhists and Jains are eligible for the admission, according to the statement.

Application forms are available on campus at the humanities department and have to be submitted between 2 and 6pm by the said deadline.

The centre gets financial aid from the University Grants Commission (UGC) for its functioning, which helps in coaching for civil services exams like the Union Public Service Commission (UPSC) and Maharashtra Public Service Commission (MPSC) along with banking and other competitive examinations. A university official said that the centre offers experts' lectures, coaching, personality development and skill enhancement for the duration of one year for three hours daily. The focus at the centre mainly remains on the group discussions about important happenings.

The official added that the centre is equipped with Internet-enabled computers and there are as many as 1,200 books available at the library. From 2005 to 2014, over 90 students from the centre have qualified and been appointed to various positions in the state government, said the official.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 OCT 2018
पुण्यनगरी

# विद्यापीठाचा चर्मवस्तू उत्पादक संघाशी करार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ आणि जिल्हा चर्मवस्तू उत्पादक, कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रा. लि. यांच्यात गुरुवारी कोल्हापुरी चप्पल क्लस्टरसंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या सामंजस्य करारप्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, डॉ. गजानन राशिनकर, क्लस्टरचे चेअरमन अशोक गायकवाड यांच्यासह संघाचे पदाधिकारी, सदस्य आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापुरी चप्पलचे जागतिक स्तरावर नाव असले तरी बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालून वाढत्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी स्थानिक उद्योजकांना सज्ज होण्याची गरज आहे. कोल्हापुरी चप्पलचे भौगोलिक स्थाननिश्चिती (जीआय) मानांकन झाले असले तरी त्याची गुणवत्ता सिद्ध करून देणे, विद्यापीठातील तज्ज्ञांचे दर्जावृद्धीबाबत मार्गदर्शन मिळवून देणे याबाबत विद्यापीठ सकारात्मकपणे प्रयत्न करील.

दरम्यान, रसायनशास्त्र विभागाच्या डॉ. पी. एन. भोसले यांनी कोल्हापुरी चप्पलच्या संशोधन व संवर्धनासाठी गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या कामाची माहिती दिली.

**कोल्हापुरी चप्पल क्लस्टर योजनेबाबत...**

कोल्हापूर जिल्हा चर्मवस्तू उत्पादक कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रा. लि.



**कोल्हापूर : जिल्हा चर्मवस्तू उत्पादक संघासमवेत सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व चेअरमन अशोक गायकवाड. सोबत प्रा. जी. एस. गोकावी, डॉ. ए. एम. गुरव, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. एन. भोसले, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील.**

ही क्लस्टर योजना लागू झाल्यामुळे दर्जेदार कोल्हापुरी चप्पलचा कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासात मोठा वाटा असणार आहे. ही हस्तकला जिवंत ठेवण्यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे.

उद्योजक, कारागिरांचे जीवनमान उंचावून कोल्हापुरी चप्पलला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी केंद्र शासनाने सूक्ष्म, लघु, मध्यम उपक्रम मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या एमएसएमई सीडीपी या योजनेंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यासाठी कोल्हापूर जिल्हा चर्मवस्तू उत्पादक विक्रेता संघटनेस कोल्हापुरी चप्पल क्लस्टर म्हणून २४ जुलै २००८ला पत्र दिले आणि जि.उ.के./क्लस्टर/बी-२९१६२ या पत्राद्वारे मंजुरी दिली. प्राथमिक निदानात्मक अहवाल (डायग्नोस्टीक स्टडी) मिटकॉन या संस्थेने पूर्ण करून लघु उद्योग मंत्रालयाला सादर केला होता, तो मंजूर होऊन शासनाने कोल्हापुरी चप्पल क्लस्टर उभारणीसाठी १५ कोटी इतक्या रकमेची तरतूद केली आहे.

26 OCT 2018
जनसंपर्क कक्ष
लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला विजेतेपद

प्रतिनिधी, कोल्हापूर

**तिसऱ्या राष्ट्रीय** आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग दुसऱ्यांदा स्पर्धेच्या विजेतेपदावर आपले नाव कोरले. मुंबई विद्यापीठाच्या संघाला सहविजेतेपद जाहीर करण्यात आले.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक तीन विद्यापीठांच्या संघांना विभागून देण्यात आला. यामध्ये महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक (हरियाणा), लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा (पंजाब) आणि बनस्थळी विद्यापीठ, राजस्थान यांचा समावेश आहे.तृतीय क्रमांकही तीन विद्यापीठ संघांना विभागून देण्यात आला. यामध्ये डॉ. हरिसिंह गौर विद्यापीठ, सागर (मध्य प्रदेश), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा समावेश आहे. कु लगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभापूर्वी बनस्थळी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ या तीन संघांनी उपस्थितांसाठी कव्वालीचे विशेष सादरीकरण केले. प्रत्येक सादरीकरणाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत होता. शिवाजी विद्यापीठ संघाच्या सादरीकरणावेळी तर हा प्रतिसाद शिगेला पोहोचला.

## कोल्हापुरात कव्वालीचाही प्रेक्षक

पोवाडा-लावणीचा परिसर असलेल्या कोल्हापुरात कव्वालीचाही चाहता रसिकवर्ग मोठ्या प्रमाणावर आहे, याची प्रचिती या स्पर्धेच्या निमित्ताने आली. शहर व परिसरातील अनेक रसिक प्रेक्षकांनी सलग दोन दिवस या स्पर्धेला उपस्थिती दर्शविली. काही प्रेक्षक तर सहकुटुंब उपस्थित राहिले. विद्यार्थ्यांनीही कव्वालीची अनुभूती वेगळी आणि हृदयस्पर्शी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

सकाळ

# माजी विद्यार्थ्यांचे योगदान गरजेचे

## जी. एस. राशिणकर; वृत्तपत्र विद्या, संवादशास्त्र विभागात माजी विद्यार्थी मेळावा

**कोल्हापूर, ता. २५ :** माजी विद्यार्थी संस्थेच्या प्रगतीमध्ये सर्व प्रकारची भूमिका बजावू शकतात. शिवाजी विद्यापीठाच्या प्रगतीमध्येही माजी विद्यार्थ्यांचा वाटा मोठा असून ते सर्वप्रकारे आपले योगदान देऊ शकतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे ॲल्युमिनी असोसिएशनचे समन्वयक जी. एस. राशिणकर यांनी केले.

वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा मानव्यशास्त्र विभागातील सभागृहात झाला. यामध्ये मास कम्युनिकेशनचे विद्यार्थीही सहभागी होते. यावेळी 'सकाळ'चे मुख्य बातमीदार लुमाकांत नलवडे यांना राज्य सरकारचा बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार, तर उपसंपादक प्रफुल्ल सुतार यांना सोशल मीडिया पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार झाला.



**कोल्हापूर : वृत्तपत्र विद्या आणि संवादशास्त्र विभागातील माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचा रोपट्याला पाणी घालून प्रारंभ झाला. (डावीकडून) डॉ. जी. एस. राशिणकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. निशा पवार-मुढे, डॉ. श्रीहरी देशपांडे, डॉ. शिवाजी जाधव आदी.**

प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय पाटील यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात शीतल माने, सुयोग घाटगे, जयश्री देसाई, आनंदा पांढरबळे, प्रा. प्रसाद ठाकूर, सुशांत पाटील, पूजा रेंदाळे, वृषाली शिंदे-खैरमोडे आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार-मुढे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, संशोधक विद्यार्थी अनुराधा इनामदार उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
26/10/2018 Page No. 6

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश केंद्रातर्फे आयोजित चंद्र निरीक्षण उपक्रमात माहिती देताना डॉ. राजीव व्हटकर.

# चंद्राचा पृष्ठभाग पाहण्याचा विद्यार्थ्यांनी घेतला आनंद

## शिवाजी विद्यापीठात चंद्र निरीक्षण उपक्रम

कोल्हापूर, ता. २५ : चंद्राच्या पृष्ठभागावरील विवरे दिसतात कशी?, याचा दुर्बिणीच्या माध्यमातून पाहण्याचा अनुभव विद्यार्थ्यांनी आज येथे घेतला. शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश केंद्रातर्फे चंद्र निरीक्षणाचा उपक्रम पदार्थ विज्ञान अधिविभागात आज रात्री झाला.

आंतरराष्ट्रीय चंद्र महोत्सव हा चंद्र विज्ञान व त्या संबंधीचे शोध याच्या स्मरणार्थ २०१० पासून साजरा होतो. यंदा अपोलो ८ या चंद्र मोहिमेला ५० वर्ष पूर्ण होत असल्यामुळे यंदाच्या चंद्र महोत्सवास विशेष महत्त्व आहे. तो २० ते २७ ऑक्टोबर दरम्यान होत आहे. त्या अनुषंगाने उपक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी अवकाश संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव व्हटकर यांनी मार्गदर्शन केले. इस्रोने अवकाशात सोडलेल्या चांद्रयान-१ ची लघुचित्रफीत दाखवण्यात आली. चंद्रयान २ बाबतची महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. चंद्राच्या पृष्ठ भागाचे विशेषतः विवरांचे निरीक्षण दुर्बिणीच्या माध्यमातून केले. खगोलप्रेमींनी चंद्र निरीक्षण व त्याविषयीच्या वैज्ञानिक माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सत्यजित पाटील, कौस्तुभ वडगावी, प्रसाद वाघमोडे, सुप्रिया कांबळे, नागेश कोठावळे, प्रमोदकुमार नवलगुंदी यांनी संयोजन केले.

Kolhapur, Main
26/10/2018 Page No. 102

# विद्यापीठात समुपदेशन कार्यशाळा

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर करिअर गाईडन्स आणि सायकॉलॉजिकल काउन्सिलिंगच्यावतीने शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांमधील शिक्षकांसाठी समुपदेशन कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा झाली. येथील प्रणव क्लिनिकच्या डॉ. शुभदा शिरीष दिवाण यांनी या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

डॉ. दिवाण म्हणाल्या, 'सध्याच्या काळात विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्या वाढलेल्या आहेत. त्याची अनेक कारणे आहेत. पूर्वीच्या काळी घरातील कर्ता पुरुष कुटुंबाच्या केंद्रस्थानी असायचा. आज घरातील मूल केंद्रस्थानी आहे. मुलाला हवे ते लगेच मिळत जाते. त्यामुळे ते आत्मकेंद्री बनत आहे. याचा नकारात्मक परिणाम असा की, जेव्हा हवी ती गोष्ट त्याला मिळत नाही, तेव्हा त्याचे मानसिक संतुलन बिघडते. समुपदेशकाजवळ सल्लार्थींची मानसिकता समजून घेण्याचे कौशल्य हवे. तसेच त्याच्या समस्येची कारणे शोधण्यात त्याला मदत करता आली पाहिजे.


शुभदा दिवाण

यावेळी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांनी स्वागत केले. सेंटर फॉर करिअर गाईडन्स अँड सायकॉलॉजिकल काउन्सिलिंगच्या समन्वयक डॉ. श्रीमती जी. एस. पाटील यांनी आभार मानले.



# सेवापूर्व मार्गदर्शन केंद्रात प्रवेश सुरू

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर विभागातून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेअंतर्गत सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राअंतर्गत प्रवेश परीक्षा अर्ज मागविण्यात येत आहेत.

यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी-नॉन क्रिमीलेअर व अल्पसंख्याक( मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन )विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या केंद्रात प्रवेश घेण्यासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांसह २९ ऑक्टोबरपर्यंत दुपारी दोन ते सायंकाळी सहा या वेळेत विद्यापीठाच्या सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारत येथे अर्ज जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. दोन नोव्हेंबर, २०१८ रोजी दुपारी चार ते सायंकाळी पाच या वेळेत मानव्यशास्त्र इमारतीत प्रवेश परीक्षा होणार आहे. गुणवत्ता यादी १३ रोजी जाहीर करण्यात येणार आहे अशी माहिती  रोजी दुपारी ४ वाजता मानव्यशास्त्र इमारतीमध्ये प्रवेश परीक्षा होईल. विद्यार्थ्यांची गुणवत्ता माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. पी.एस. कांबळे यांनी दिली आहे.

पुढारी

संक्षिप्त

# आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा शिवाजी विद्यापीठात होणार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा (पुरुष गट) शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्याच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. विद्यापीठाच्या वर्धापनदिनी शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या गुणवंत पाल्यास देण्यात येणाऱ्या पारितोषिकाच्या रकमेत तसेच गुणवंत सेवकांस दिल्या जाणाऱ्या पारितोषिकांच्या रकमेत वाढ करण्याच्या प्रस्तावासही बैठकीत मान्यता देण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सदस्य सचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आदींसह सदस्य उपस्थित होते.

# गडहिंग्लजला आज आंतरविभागीय मुलांचे कुस्ती मैदान

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथे शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज (शुक्रवार) आंतरविभागीय मुलांचे कुस्ती मैदान होणार आहे. येथील जडेयसिद्धेश्वर मठात मॅटवर खेळविण्यात येणाऱ्या स्पर्धेत सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांतील कुस्तीपटू सहभागी होणार आहेत. या मैदानात चांगली कामगिरी करणाऱ्या मल्लांमधून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ निवडला जाणार आहे. कुस्ती शौकिनांनी सहभागी व्हावे, असे आवाहन 'शिवराज'चे संचालक ॲड. दिग्विजय कुराडे, प्रा. राहुल मगदूम,